**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूरमधे पाकिस्तानच्या भूमीवरचे आणि पाकव्याप्त काश्मीरमधले ९ दहशतवादी तळ तिथल्या नागरी आणि लष्करी आस्थापनांना धक्का न लावता उद्धवस्त

- यशस्वी मोहिमेबद्दल केंद्रसरकारचं देशभरातून कौतुक / केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत व्यक्त झाला प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वावर विश्वास

- कोळसा वापर आणि वाटप करण्याच्या सुधारित ‘शक्ती’ योजनेला केंद्रीय मंत्रमंडळाच्या अर्थ व्यवहार विषयक समितीची मान्यात

- गडचिरोलीत खनिकर्मविषयक अभ्यासक्रमासाठी गोंडवाना विद्यापीठाचे परदेशी विद्यापीठांबरोबर करार

**आणि**

- ज्येष्ठ नाट्य समीक्षक आणि अभिनेते माधव वझे यांचं निधन

**<><><><><>**

पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधे राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर मधे दहशतवाद्यांचे ९ तळ उद्धवस्त झाले आहेत. परराष्ट्र व्यवहार विभागाचे सचिव विक्रम मिस्त्री, भारतीय लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि हवाई दलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी दिल्लीत झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

पहाटे एक वाजून पाच मिनिटांनी सुरु झालेली ही मोहीम दीड वाजता संपली. गेली ३० वर्षं पाकिस्ताननं पुरवलेल्या पायाभूत सुविधांच्या आधारे

इथं दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिलं जात होतं. पाकिस्तानच्या कोणत्याही नागरी वस्तीला किंवा लष्करी आस्थापनांना धक्का न लावता ही मोहीम फत्ते झाल्याचं त्यांनी सांगितलं.

या कारवाईतून पाकिस्तानचे दहशतवादाशी लागेबांधे उघड झाले असल्याचं विक्रम मिस्त्री म्हणाले. या मोहिमेबाबात माहिती देणारं दृक्श्राव्य सादरीकरण या पत्रकारपरिषदेत देण्यात आलं. ऑपरेशन सिंदूर नंतर केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं झाली. मंत्रिमंडळ सदस्यांनी या मोहिमेबद्दल प्रधानमंत्र्यांचं अभिनंदन केलं आणि त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. त्यानंतर प्रधानमंत्र्यांनी दुपारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन त्यांना ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती दिली. या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेन्द्र  मोदी यांनी ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर  तीन देशांचा आगामी दौरा स्थगित केला आहे. प्रधानमंत्री मोदी या महिन्यात क्रोएशिया, नॉर्वे आणि नेदरलैंड्सच्या दौऱ्यावर जाणार होते.

**<><><><><>**

या मोहिमेनंतर देशाच्या उत्तर भागातल्या अनेक विमानतळांवरची व्यावसायिक वाहतूक सेवा बंद ठेवण्यात आली आहे. राजस्थान,पंजाब आणि जम्मूकाश्मीरमधे विमानतळ बंद ठेवण्यात आले आहेत. सुरक्षा यंत्रणा सतर्क असून  सीमावर्ती भागातल्या शाळा बंद ठेवण्याचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आहे.

<><><><>

जम्मू काश्मीरमध्ये पूंछ, राजौरी, कुपवाडा, बारामुल्ला भागात काल रात्री पाकिस्तानच्या लष्करानं  नियंत्रण रेषेच्या आसपास  जोरदार गोळीबार केला. यात नऊ नागरिकांचा मृत्यू झाला असून ४१ जण जखमी झाले आहेत. ऑपरेशन सिंदूर झाल्यानंतर पाकिस्तानी लष्करानं हे शस्त्रसंधी उल्लंघन केलं. भारताच्या बाजूनंही याला सडेतोड उत्तर दिलं जात आहे. या गोळीबारात या भागातल्या अनेक घरांचं नुकसान झाल्याचं वृत्त आहे.

<><><><>

भारतीय संरक्षण दलानं राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' चं सर्व पक्षीय नेत्यांनी कौतुक केलं आहे.

पहलगाममध्ये देशातल्या निरपराध बांधवांच्या निर्घृण हत्येला भारतानं दिलेली प्रतिक्रिया म्हणजे ऑपरेशन सिंदूर आहे असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय लष्कराचं कौतुक केलं. जगानं दहशतवादाबाबत झीरो टॉलरन्स धोरण दाखवलं पाहिजे असं मत परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी व्यक्त केलं आहे. आपल्याला भारतीय लष्कराचा अभिमान आहे असं लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस दहशतवादाविरोधात कोणतीही निर्णायक कारवाई करण्यासाठी लष्कर आणि सरकारच्या पाठीशी ठामपणे उभी आहे असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे.

<><><><>

ऑपरेशन सिंदूरनंतर केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्याशी राज्यातल्या सुरक्षा परिस्थितीबद्दल चर्चा केली. सीमावर्ती  भागात राहणाऱ्या नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी सीमा सुरक्षा दलाच्या महासंचालकांना दिले. नागरिकांच्या सुरक्षेला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं गृहमंत्र्यांनी सांगितलं. रजेवर गेलेल्या कर्मचाऱ्यांना तातडीनं कामावर रुजू होण्यासाठी बोलावण्याचे आदेश त्यांनी निमलष्करी दलांना दिले.  सीमेजवळच्या राज्यांचे मुख्यमंत्री , पोलीस महासंचालक तसंच  मुख्य सचिव यांची बैठक घेऊन गृहमंत्र्यांनी  त्यांना मार्गदर्शन केलं.

**<><><><><>**

२६ निरपराधांचे बळी घेणाऱ्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याला भारतानं चोख प्रत्युत्तर दिलं असल्याची प्रतिक्रीया राज्यात उमटत आहे. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

***होल्ड व्हाईस कास्ट***

*कुठलाही दहशतवाद भारत सहन करणार नाही, हे भारतीय सैन्यदलानं दाखवून दिलं आहे. ऑपरेशन सिंदूर मोहिमेनं हे सिद्धच केलं आहे. या हवाई हल्ल्ल्यानं दहशतवाद्यांचे तळ आणि प्रशिक्षण केंद्र उद्धवस्त केली आहेत. सैन्य दलाच्या या कारवाईबद्दल, दहशतवादी हल्ल्यात मृत पावलेल्या पर्यटकांचे नातेवाईक म्हणाले...*

***शहिदांचे नातेवाईक***

*सैन्यदलाच्या कारावाईबद्दल लष्करी दृष्टीकोनातून प्रकाश टाकताना हेमंत यांनी विस्तृत प्रतिक्रिया दिली.*

***हेमंत महाजन***

*राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या कारवाईबद्दल समाधान व्यक्त करताना सांगितलं..*

***एकनाथ शिंदे..***

*आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सैन्यदलाचं कौतुक तर केलंच शिवाय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन करुन त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली..*

***देवेंद्र फडनवीस***

*सैन्यदलाच्या या कारवाईनंतर, आता भारताकडे वाकड्या नजरेनं पाहणाऱ्या दहशतवादी संघटना आणि त्यांचे आका पुरेपुर बोध घेतील, हे नक्की.*

**<><><><><>**

कोळसा वापर आणि वाटप करण्याच्या सुधारित ‘शक्ती’ योजनेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालच्या अर्थ व्यवहार विषयक मंत्रीमंडळ समितीने मान्यता दिली आहे. केंद्र, राज्य आणि स्वतंत्र औष्णिक वीज केंद्रांना कोळसा पुरवठा करण्यासाठी या योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. नव्या शक्ती धोरणामुळे औष्णिक वीज केंद्रांना कोळशाचं नियोजन करणं शक्य होईल, असं मंत्रीमंडळ समितीने म्हटलं आहे.

देशातल्या पाच नव्या आयआयटी च्या शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांचा विस्तार करायला केंद्रीय मंत्रीमंडळाने आज मंजुरी दिली. आंध्र प्रदेश, केरळ, छत्तीसगड, जम्मू काश्मीर आणि कर्नाटक या पाच राज्यांमधे हे आयआयटी आहेत. २०२५-२६ आणि २०२८-२९ या चार वर्षांच्या कालावधीत यासाठी ११ लाख ८२८ कोटी रुपये खर्च येणार आहे, असं शिक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

१९६३ मधे एका छोट्या रॉकेटचं प्रक्षेपण करण्यापासून चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरण्यापर्यंतचा टप्पा भारतानं गाठला असून भारताचा हा प्रवास भारताच्या प्रगतीचं द्योतक आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीत आजपासून GLEX' अर्थात १२ वी 'जागतिक अंतराळ संशोधन जागतिक शिखर परिषद सुरू झाली. या परिषदेला प्रधानमंत्र्यांनी आज संबोधित केलं. या परिषदेचं उद्घाटन अंतराळ आणि अणुऊर्जा राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांच्या हस्ते आज झालं. आंतरराष्ट्रीय अंतराळवीर महासंघ, भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रो तसंच भारतीय अंतराळवीर सोसायटी यांनी संयुक्तपणे GLEX 2025 आयोजित केली आहे. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत ३६ देशांमधल्या २३३ आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींसह १८०० हून अधिक प्रतिनिधी सहभागी होत आहेत.

<><><><><>

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान दरम्यान तणावाच्या पार्श्वभूमीवर देशात ठिकठिकाणी आज मॉक ड्रिल म्हणजे युद्ध सज्जता सराव करण्याचे आदेश केंद्रीय गृह मंत्रालयानं दिले आहेत. अतिसंवेदनशील ठिकाणांमधे मुंबई, उरण आणि तारापूर यांचा समावेश आहे. त्याखेरीज ठाणे, पुणे, नाशिक, रोहा-धाटाव-नागोठणे, मनमाड, सिन्नर, थळ-वायशेत, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या ठिकाणी मॉकड्रील घेण्यात येणार आहे. त्यासंबंधी आवश्यक सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर मॉक ड्रिल घेण्यात आलं.

हल्ला झाला तर सुरक्षेच्या दृष्टीनं करण्याच्या हालचालींविषयी नागरिकांना, विशेषतः विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणं, तसंच धोक्याचा इशारा देणारी यंत्रणा, नियंत्रण कक्ष, इत्यादींची सज्जता तपासून पाहणं हा या सरावाचा भाग आहे.

<><><><><>

खनिजसंपन्न गडचिरोली जिल्ह्यात खनिकर्म विषयाचे विविध अभ्यासक्रम उपलब्ध होणार आहेत. स्वायत्त 'विद्यापीठ तंत्रज्ञान संस्था' स्थापन करण्याबाबत गडचिरोलीचं गोंडवन विद्यापीठ आणि ऑस्ट्रेलियाचं कार्टीन विद्यापीठ यांच्यात आज यासंदर्भातल्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. मुंबईत राजभवन इथं राज्यपाल सी पी राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा करार झाला.

<><><><><>

प्रसिद्ध अभिनेते आणि नाट्य समीक्षक माधव वझे यांच आज सकाळी निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. केंद्र शासनाकडून दिल्या जाणाऱ्या 'राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये' सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचा पहिला सुवर्ण कमळ पुरस्कार प्राप्त करणाऱ्या 'श्यामची आई' या चित्रपटात त्यांनी बालकलाकाराची भूमिका केली होती. राज्य नाट्य स्पर्धेमध्ये उत्कृष्ट अभिनयासाठी त्यांना पदकं मिळाली होती. डिअर जिंदगी ,थ्री इडियट्स या हिंदी चित्रपटांतल्या त्यांच्या भूमिका प्रेक्षकांच्या विशेष स्मरणात राहिल्या. ते पुण्याच्या वाडिया कॉलेजातून इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले होते.

<><><><><>

भारतीय हवामान विभागाकडून पालघर जिल्ह्यात आज डहाणू, वाढवण भागात वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू आहे. येत्या दोन दिवसांत पालघर जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह तसंच विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. काल रात्री झालेल्या अवकाळी पावसामुळे डहाणू मधल्या अनेक मच्छीमार बोटींचे नुकसान झाले आहे.

**धुळे** शहर आणि परिसरात आज दुपारी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. अचानक आलेल्या वादळाने धुळ्यात काही ठिकाणी झाडे पडली आहे. तर लोकांची तारांबळ उडाली.

**नाशिक** जिल्ह्यात आज दुपारनंतर जवळपास सर्वच भागात अवकाळी पावसासह गारपीट झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले. अनेक ठिकाणी कांदा चाळींवरील पत्रे उडाले, तर काढून ठेवलेला कांदा वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. या पावसामुळे कांदा भिजल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले. काढणीस आलेल्या कांद्याच्या पातीत पाणी शिरल्याने कांदा सडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**रत्नागिरीत** पहाटे तीननंतर जोराचे वारे आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाने हजेरी लावली.

**मुंबई आणि ठाणे** परिसराला काल धुळीच्या वादळाचा तडाखा बसला.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स हा सामना कोलकात्याच्या ईडन गार्डन मैदानावर होणार आहे. आजचा सामना जिंकणं कोलकाता नाईट रायडर्स करता महत्त्वाचं असून पराभव झाल्यास हा संघ स्पर्धेतून बाहेर जाईल. चेन्नई सुपर किंग्ज आधीच स्पर्धेबाहेर गेला आहे.  मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्स संघानं डीएलएस नियमाच्या आधारे मुंबई इंडियन्स संघाचा तीन गडी राखून पराभव केला.

<><><><><>

शांघाय इथं सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या पुरुष आणि महिला संघांनी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. पुरुष संघानं उपांत्य फेरीत डेन्मार्कचा २३२-२३१ असा तर महिलांनी ग्रेट ब्रिटनचा २३२-२३० असा पराभव केला. अंतिम फेरीत भारतीय पुरुष संघाचा सामना १०मेला मेक्सिकोशी होणार आहे.

//<><><><><>//